**MHAK100013082025**

**<u>Civil M.A./173/2025</u>**
**Ramdas Chintaman Gawai Vs. Nil**
(पारीत दिनांक ०६.०३.२०२६)

१) अर्जदारांनी सदरचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन VIII १८२७ चे नियम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केला आहे. शासन निर्णय क्रमांक ५८६१ दिनांक २५.१०.१८९०, दिवाणी नियमावली मधील परिच्छेद क्रमांक ३०४ तसेच कायदेशीर वारसप्रमाणपत्र (८/१८८९) आणि आदेश पान क्रमांक १२६९, खंड–१ तसेच बाम्बे लोकल रूल्स आणि केंद्रीय कायदा १९५३ अन्वये सदर वारसप्रमाणपत्र कामी दाखल अर्जावर कामकाज करण्याचे जिल्हा न्यायालयाचे अधिकार दिवाणी न्यायाधीश यांना प्रदान करण्यात आले आहे. सदर अधिकारांचा वापर करून मी दिवाणी न्यायाधीश क.स्तर प्रस्तुत प्रकरणात आदेश पारीत करीत आहे.

२) अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, मयत चिंतामन चेंडू गवई व मयत द्रुपदाबाई चिंतामन गवई हे अर्जदाराचे वडील व आई होत्या. मयत चिंतामन चेंडू गवई यांचा मृत्यु दिनांक २५.११.१९७० रोजी दिग्रस बु. ता. पातूर जि. अकोला येथे झाला आहे. तसेच अर्जदार यांची आई द्रुपदाबाई चिंतामन गवई हया अर्जदार यांच्या वडीलांच्या आधी म्हणजेच अर्जदार यांच्या लहानपणी मौजे दिग्रस बु. ता. पातुर जि. अकोला येथे मयत झाल्या आहेत. मयत चिंतामन चेंडू गवई यांचे कायदेशीर वारस असल्याचे अर्जदाराचे म्हणणे आहे. तसेच त्यांना मयत चिंतामन चेंडू गवई यांच्या वारस प्रमाणपत्राची शासकीय व निमशासकीय व इतर कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता असल्याने त्यांनी सदरचा अर्ज न्यायालयामध्ये दाखल केलेला आहे.

३) अर्जदाराने केलेला अर्ज, परिस्थिती, समोर आलेला पुरावा, तसेच अर्जदारांच्या वतीने करण्यात आलेला युक्तिवाद यांचा विचार करता या प्रकरणात खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होत असून त्यावर सविस्तर कारणमिमांसा देवून मी खालीलप्रमाणे माझा निष्कर्ष आणि निवाडा दिला आहे

| मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- |
| १. अर्जदार हे सिध्द करतात का की, ते मयत चिंतामन चेंडू गवई यांचे वारस आहे? | ........ होय. |
| २. आदेश काय ? | .... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

मुद्दा क्रमांक १ व २ करिता :

४) अर्जदार रामदास चिंतामन गवई यांनी त्यांचा पूरावा प्रतिज्ञालेख नि.क्र ०९ वर दाखल केला आहे. अर्जदार यांनी त्यांच्या सरतपासाच्या शपथपत्रात त्यांच्या अर्जातील मजकूराचा पुर्नउल्लेख केला आहे. अर्जदाराने मयत चिंतामन चेंडू गवई यांचे मृत्यु प्रमाणपत्र नि.क्र १२ वर दाखल केले आहे. अर्जदाराचे आधारकार्ड नि.क्र. १३ वर दाखल केले आहे. अर्जदार हिंदू धर्माचे असल्याने अर्जदार हे हिंदु वारसा कायदा १९५६ चे कलम ८, परिशीष्ट–१ नियम १ अन्वये वारस आहेत, तसेच अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार हे मयत चिंतामन चेंडू गवई यांचे वर्ग–१ मधील पहील्या सदरातील वारस आहेत.

५) मा. नामदार उच्च न्यायालय मुंबई यांचे गणपती विनायक अचवाल वि. महाराष्ट् सरकार एम.एल.जे. २०१४ (६) ६८३ या निवाडया मधील परिच्छेद क्रमांक ५ व ६ खालीलप्रमाणे.

> *"5. The position of law that emerges from the above provision is that, an heirship certificate does not bestow the status of an heir upon a person. Grant of such a certificate is only a formal recognition of his existing status as an heir. An heir or executor or legal administrator, by his such status, can assume management of the property of the deceased even without a formal recognition by the Court. A person may obtain heirship certificate is any of the three situations i.e., (i) if he desires, (ii) where his right as an heir is disputed, and (iii) in order to give confidence to the persons in possession of or indebted to the estate and to*

*deal with them. Thus, grant of heirship certificate is solely, for the convenience of the heir. Beyond that, it is of no significance. The rules also indicate that, **it is mandatory for the court to issue an heirship certificate, if after publication of citation, no objector comes forward within one month from the date of publication.** In that case, the Court shall forthwith receive such proofs as may be offered of the right of the person making the claim, and if satisfied, shall grant a certificate in the prescribed form declaring him the recognized heir of the deceased. The scope of such enquiry is limited to ascertain the claim of heirship of the applicant. The petitioner's claim and the impugned order are required to be appreciated against the above legal position.*

*….. The only relevant consideration was, whether the applicant establishes that he is the heir of a person in respect of whom, he seeks heirship certificate. If no objector comes forward as provided by rule – 3 of chapter -I of the Regulation, the Court must grant certificate to the applicant……… This Court, looking in to the purpose of issuance of heirship certificate under the Regulations held that, for considering such an application, the Court is not required to determine the title of the deceased or the persons claiming heirship certificate to any property. The Court is only required to consider whether the persons claiming heirship certificate is the heir of the deceased."*

६) दिनांक १६.०१.२०२६ रोजी दैनिक 'जनमाध्यम' वृत्तपत्र नि.क्र.१४ मध्ये, चावडीवर व या न्यायालयाच्या सुचना फलकावर अर्जाबाबत जाहिर नोटिस प्रसिध्द करूनही अर्जदार यांना मयत चिंतामन चेंडू गवई यांचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्र देण्यास कोणीही आक्षेप घेतलेला नाही. अर्जदार हे या न्यायालयाचे स्थळ सिमेतील असुन, मयत चिंतामन चेंडू गवई हे दिग्रस बु. ता. पातुर जि. अकोला येथील कायमस्वरूपी रहिवासी होते. अर्जदारांचा पुरावा व अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा याला कोणीही आव्हान केलेले नाही. तसेच वर नमुद निवाडयातील मार्गदर्शक तत्वे या सर्वांचे अवलोकन केले असता अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देण्यास काहीही बाधा

दिसून येत नाही. म्हणुन अर्जदाराचा अर्ज न्यायाचे दृष्टीने मंजुर करणे योग्य राहील. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी देतो व मुद्दा क्रमांक २ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे :—

## आ दे श

१) अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) अर्जदार रामदास चिंतामन गवई हे मयत चिंतामन चेंडू गवई यांचे प्राथमीक वारस असल्याचे बॉम्बे रेग्युलेशन VIII चे नियम २ अन्वये घोषीत करण्यात येते.

३) वरिल प्रमाणे बॉम्बे रेग्युलेशन VIII चे Appendix-B प्रमाणे अर्जदारांना वारस प्रमाणपत्र महाराष्ट्र न्यायालयीन शुल्क कायदा १९८९ चे Schedule–I अन्वये स्विकारून प्रमाणपत्र देण्यात यावे.

४) अर्जदारांनी दिवाणी नियमावलीचे परिच्छेद क्रमांक ३१२ चे तंतोतंत पालन करावे.

५) न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात येतो.

SANDIP BHASKARRAO MORE
Digitally signed by SANDIP BHASKARRAO MORE
Date: 2026.03.06 17:37:52 +0530

( एस.बी.मोरे)

दिनांक: ०६.०३.२०२६. सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), पातुर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word to word as per original .

| | |
|---|---|
| Name of Stenographer | : K.M.Mahalle |
| Court Name | : S.B.More Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Patur |
| Date | : 06.03.2026 |
| Signed by presiding officer on | : 06.03.2026 |
| Uploaded on | : 06.03.2026 |